महाराष्ट्र-पोलीस

# प्रेस नोट

जा.क्र. ७६६ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय,भंडारा
दिनांक:- १५.११.२०१७

## अल्पवयीन बालिका विनयभंगाचे गुन्हयात आरोपीस चार वर्ष कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा

पो.स्टे. लाखांदुर अंतर्गत ग्राम राजनी येथील घटणा असुन यातील अल्पवयीन तक्रारदार दिनांक १९.११.२०१५ रोजी पोलीस ठाणे लाखांदुर येथे तक्रार दिली की, नमुद् तारखेला आई-वडील शेतात कामावर गेले असता सांयकाळी ५.०० वा. दरम्यान पिडित अल्पवयीन तक्रार हि घरी स्वयंपाक करीत होती दरम्यान हात धुने करीता घराचा मागचा दार ऊघडुन बाहेर जात असता घरा जवळ राहत असनारा आरोपी नामे प्रकाश बाळा खरकाटे, वय २१ वर्ष हा घरात घुसला आणि पिडितेस अवांच्छीत स्पर्श करू लागला पिडिता त्याचे पासुन दुर जात असता आरोपीने केस ओढुन पिडितेवर बदनामी केल्याचा आरोप लावुन जिवे मारण्याची धमकी दिली अशा तक्रारीवरून आरोपी नामे प्रकाश बाळा खरकाटे, वय २१ वर्ष रा. गौरळा ह.मु. राजनी याचे विरूध्द पो.स्टे. लाखांदुर अप.क्र. ६४/१५ कलम ३५४(अ)(१),४४८,५०६ भादवि सह कलम १२ बाल लैगीक अत्याचार अधिनीयम अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरिक्षक सुधिर बंडीवार, पो.स्टे. लाखांदुर यांनी केला तपासात आरोपीस अटक करून साक्षपुरावा गोळा करून आरोपी विरुध्द विशेष जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दोषारोपपत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुणावणी मा. सत्र न्यायाधिश आर. पी. पांडे सा. यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **अॅडव्होकेट श्री. रमाकांत खत्री**, सहा. सरकारी अभियोक्ता सत्र न्यायालय, भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दि. १५.११.२०१७ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवन आरोपी विरूध्द दोषसिध्द झाल्याने कलम १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतीबंधक अधिनीयम अन्वये दोषी ठरवुन **चार वर्ष सश्रम कारावास व १०,०००/-रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली,** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक,

मंडलवार यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार सुरेश भलावी, ब.न. ८६ व पो.ना. सुरेश आत्राम, ब.नं. ७९ पो.स्टे. लाखांदुर यांनी पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(सुनिल व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी क्र. ९९८७३८५४०५

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.